## दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) (पूर्व) परीक्षा -२०१५

## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ३१ मे, २०१५ रोजी घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) (पूर्व) परीक्षा -२०१५, चा निकाल दि. २९/०८/२०१५ रोजी जाहीर करण्यात आला आहे. उमेदवारांच्या माहितीकरिता प्रस्तुत निकाल व गुणांची सीमारेषा आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरही प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. **उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येत आहे. तपासणीमध्ये अपात्र ठरणा-या उमेदवारांची उमेदवारी, आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची कृपया नोंद घेण्यात यावी. मुख्य परीक्षा दिनांक ४ ऑक्टोबर, २०१५ रोजी मुंबई, औरंगाबाद व नागपूर हया तीन केंद्रावर घेण्यात येईल.**

३. मुख्य परीक्षेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा कालावधी/ दिनांक तसेच अधिसूचना लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

४. प्रस्तुत निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना, त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क विहित मुदतीत विहीत पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील. तसेच, पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरीता स्विकारार्ह असल्याने उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या अर्जात तेच दावे करावेत. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

विजया पडते
उपसचिव,
महाराष्ट्र लोकसेवआयोग, मुंबई

ठिकाण :- मुंबई
दिनांक :- २९/०८/२०१५